News Paper Name :- Maharashtra Times.

News Paper Date :- 10 May 2011

Maharashtra Times 10 May 2011

# गुरुदेवांच्या साहित्याचा मराठी उच्चार




**नवी दिल्ली**

डोईवर पुणेरी पगडी आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर रचलेल्या कवितेचा संदर्भ देत केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांतील सांस्कृतिक ऋणानुबंध रविवारी अधिक दृढ केला. औचित्य होते ते केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य व राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी रवींद्रनाथांवर लिहिलेल्या ग्रंथत्रयीच्या प्रकाशनाचे...

डॉ. जाधव यांच्या 'भयशून्य चित्त जेथ' (अनुवादित कविता), 'रवींद्रनाथ टागोर : युगनिर्माता विश्वमानव' (जीवनपट, वैचारिक जडणघडण), 'रवींद्रनाथ टागोर : समग्र साहित्य दर्शन' (भाषणे, कथा, कादंबऱ्या, कादंबरी) या ग्रंथत्रयीचे प्रकाशन प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते रविवारी येथे झाले. सुप्रीम कोर्टातील न्यायमूर्ती व्ही. एस. सिरपूरकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव जवाहर सरकार हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. 'रवींद्रनाथांच्या साहित्याने समाजाला सदैव प्रेरणा दिली आहे. त्यांच्या अनेक कलाकृतींमधून राष्ट्रीय भावनेचा प्रत्यय आलेला आहे. छत्रपती शिवरायांवरील रवींद्रनाथांची कविता म्हणजे त्यांच्या स्वराष्ट्रधर्माचे प्रतिक आहे', असे उद्गार मुखर्जी यांनी यावेळी काढले. गुरुदेवांचे विचार आजच्या काळाशीही सुसंगत आहेत, असे न्यायमूर्ती व्ही. एस. सिरपूरकर यांनी नमूद केले.

रवींद्रनाथांचे तत्त्वज्ञान अभिजनांमध्ये रुजवण्यासाठी डॉ. जाधव यांचे साहित्य उपयुक्त ठरेल, असे सांगतानाच, शिवरायांवरील टागोरांची कविता मराठी माणसाला महिती नसणे खेदजनक आहे, असे उद्गार दिलीप पाडगावकर यांनी काढले. यावेळी या ग्रंथत्रयीच्या निर्मितीची कथा डॉ. जाधव यांनी उलगडली.

भाजप खासदार प्रकाश ज़ावडेकर, केंद्रीय मंत्री सलमान खुर्शिद, 'ग्रंथाली' प्रकाशनचे सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी, लतिका भानुशाली आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुंधरा जाधव यांनी केले.

**News Paper Name :** Hindustan Times

**News Paper Date :** 6 May 2011

TAGORE LITERARY AWARDS

Hindustan Times 6 May 2011

# Writers awarded for their contribution to Indian languages

**Aarefa Johari**
aarefa.johari@hindustantimes.com


**MUMBAI:** For authors Somai Kisku and Santosh Khajuria receiving the Tagore Literary Awards on Thursday was a big milestone.

Kisku writes in Santhali and Khajuria in Dogri, two languages that were recognised as official Indian languages only in 2003 and had not been included in any national-level literary awards before.

The two languages are among the eight languages chosen for the Tagore Literary Awards 2010 for their contribution in Indian languages. The award was instituted last year by Samsung India and the Sahitya Akademi. In a ceremony at Dadar's Ravindra Natya Mandir, the Akademi also awarded writers from Urdu, Marathi, Rajasthani, Tamil, Assamese and Odia.

"It was a struggle to get the Santhali language recognised. Such an award would serve as a huge encouragement for our writers," said Kisku, whose novel, Namalia, explores the pathos of tribals displaced from their homelands by large infrastructure projects. The book is now being translated into Hindi.




Author Santosh Khajuria and Urdu poet Chander Bhan Khayal recieve their awards at the ceremony on Thursday. PHOTOS: KALPAK PATHAK

The awards were given to writers across all genres, from fiction and short stories to poetry and even literary criticism.

"Books of literary criticism are seldom given national level awards, so this one is a surprising exception," said RG Jadhav, Pune-based author of Nivadak Samiksha, a collection of critical essays on important Marathi books and issues in the Marathi literary world.

For Urdu poet Chander Bhan Khayal, the award for his ghazal collection Subah-e-Mashriq ki Azan is special because of the increasing value being given to Indian English literature.

"Every language has its own place and its writers are just as deserving of attention as English writers," said Khayal.

The Tagore Awards plan to cover 24 regional languages in three-year cycles, focusing on eight languages every year.

"We are a one of the world's largest English-speaking nations, but returning to one's roots is equally important and it is time we promote literature in Indian languages," said Ruchika Batra, head of corporate communications in Samsung's south-west Asia division.

सकाळ 8 मे २०१५

# टागोर यांच्याबद्दल महाराष्ट्रात अभ्यास कमी

## केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची खंत

**पुणे, ता. ७ :** "गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा महाराष्ट्राशी दीर्घकाळ ऋणानुबंध असूनही त्यांच्याबद्दल येथे फारसा अभ्यास झालेला नाही, त्यांचे अनेक पैलू येथील नागरिकांना अद्याप अपरिचित आहेत," अशी खंत केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी वसंत व्याख्यानमालेत व्यक्त केली.

'गुरुदेव रवींद्रनाथ टागोर : एक अमर्याद पुरुषोत्तम' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जाधव बोलत होते. ते म्हणाले, "रवींद्रनाथांनी साहित्य, संगीत व कला क्षेत्रात अपूर्व योगदान दिले आहे. त्यामुळे ते युगनिर्माते होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रावर त्यांचे अपरंपार प्रेम होते. महात्मा गांधी व त्यांच्यात मतभेद असून त्यांचा परस्परांवर स्नेह होता. त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक व त्यांच्यातही एक अनामिक नाते होते."

"टिळकांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्यावर १९०४ मध्ये शंकर गणेश देऊसकर यांनी कोलकत्यात 'शिवउत्सव' सुरू केला होता. त्यातील पहिले व्याख्यान रवींद्रनाथांनी दिले होते. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांवर कविता केली होती. त्याचप्रमाणे रवींद्रनाथ हे संत तुकाराम महाराजांचेही भक्त होते. ते व त्यांचे बंधू सत्येंद्रनाथ यांनी संत तुकारामांच्या ओव्यांचा अभ्यास केला होता. रामशास्त्री प्रभुणे यांच्यावरही रवींद्र नाथांनी कविता केली होती," असे डॉ. जाधव यांनी नमूद केले. सुरेश पिंगळे यांनी प्रास्ताविक केले.